# कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि,गौतमनगर.

पो,कोळपेवाडी,ता.कोपरगांव,जि.अहमदनगर

जा.क्र.ऊस विकास/ ११२१ दिनांक- २३/७/२०२०

## --परिपत्रक--

## आडसाली ऊस लागवड धोरण

## लागवड हंगाम सन २०२०-२१ (गळीत हंगाम सन २०२१-२२ )

कारखान्याचे कार्यक्षेत्रातील सर्व 'अ' वर्ग व 'क' वर्ग ऊस उत्पादकांना विनंतीपुर्वक कळविणेत येते की,कारखान्यास गळीत हंगामाचे सुरवातीस पुरेसा पक्व ऊस उपलब्ध होणेकरीता लागवड हंगाम सन २०२०-२१ (गळीत हंगाम २०२१-२२) करीता आडसाली ऊस लागवडीचे धोरण कारखान्याचे मा.संचालक मंडळाने खालीलप्रमाणे घेतलेले आहे.

### अ) आडसाली ऊस लागवड धोरण -

**१) कालावधी व शिफारशीत ऊस जाती -**

| लागवड हंगाम | लागवड कालावधी | शिफारशीत ऊस जाती |
|---|---|---|
| आडसाली | १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२० | को-८६०३२,कोएम-०२६५, व्ही.एस.आय.१२१२१(व्ही.एस.आय.०८००५) |

**२) लागवड पध्दत** -: ४ ते ५ फुट पट्टा अथवा जोडओळ.

**३) ऊस बेणे** -: आडसाली ऊस लागवडीकरीता ऊस बेणेची गरज असणा-या शेतक-यांना कारखाना हमीवर रु.८०००/- पर्यत ऊस बेण्याचा उधारीने पुरवठा करण्यात येईल. तसेच को-८६०३२ व व्ही.एस.आय ०८००५ या जास्त साखर उतारा देणाऱ्या जातीची कार्यक्षेत्रात ऊस लागवड झाल्यास व असा ऊस गळीतास आल्यास अशा ऊस जातीस रु.४०००/- प्रती एकर ऊस गाळपास आलेनंतर बेणे अनुदान देणेत येईल.उर्वरीत रक्कम शेतकऱ्यांच्या नावे टाकण्यात येईल. मात्र ऊस गाळपास न आल्यास संपुर्ण बेणे रक्कम प्रचलित व्याजदर आकारुन वसुल करण्यात येईल. कार्यक्षेत्रामध्ये को-८६०३२ व व्ही.एस.आय ०८००५ या ऊस जातीचे बेणे उपलब्ध न झाल्यास शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे कारखान्यामार्फत कार्यक्षेत्राबाहेरुन किंवा इतर विभागातुन आणुन त्याची तोड व वाहतुक करुन ते वितरीत करण्यात येईल व ऊस गाळपास आल्यानंतरच प्रती एकरी रु.४०००/-बेणे अनुदान देण्यात येईल. उर्वरीत रक्कम त्यांचे नावे टाकण्यात येईल. तसेच कार्यक्षेत्रातील ऊस बेणेचा खरेदी विक्रीचा दर ऊस उत्पादकांनी परस्पर ठरवावयाचा आहे. परंतु कारखान्याची बेणे विक्री चिठ्ठी असल्याशिवाय परस्पर बेणे विक्री करु नये.

**४) ऊस रोपे** -:

अ) जे शेतकरी ऊस रोपे विकत घेऊन ऊस लागवड करतील त्यांना कारखान्याने नियुक्त केलेल्या नर्सरीज मधुन ऊस रोपे उधारीने उपलब्ध करुन दिले जातील. त्याकरीता ऊस रोपे बुकींग करते वेळी प्रती रोप १/- रु (एक) या प्रमाणे आगाऊ रक्कम शेतक-यास कारखान्याकडे जमा करावी लागेल.

ब)कारखान्यामार्फत शेतकरी सहभाग (डिपॉझीट) व अधिक प्रती एकरी रु.८,०००/-पर्यंत रक्कम शेतक-याच्या मागणीनुसार ऊस रोपे खरेदी कामी सदर नर्सरी कडे परस्पर जमा केली जाईल व सदरची डिपॉझीट रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम रोपे खरेदीदार शेतकऱ्यांचे नावे टाकुन गळीतास येणा-या ऊस बिलातुन व्याजासह वसुल करण्यात येईल.

मागील पानावर/-

क) कारखान्याने प्रती एकर ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा ऊस रोपे खरेदी कामी देऊ केलेल्या अॅडव्हॉन्स (उचल) वजा जाता जास्तीची होणारी रोपे खरेदीची रक्कम शेतक-याने परस्पर संबंधित नर्सरीस अदा करावी लागेल. तसेच बुकिंग नंतर रोपे ३० ते ४० दिवसात उपलब्ध करुन दिले जातील.

ड)जे शेतकरी रोपे तयार करणेसाठी कोकोपीट, पॉली ट्रे ,ऊस बेणे स्वत:चे वापरतील अशा शेतक-यांची रोपांपासुनची ऊस लागवड प्रत्यक्ष पाहणी करुन त्यांना बेणे अॅडव्हान्स प्रती एकरी रु.८,०००/- धोरणाप्रमाणे देण्यात येईल.

इ)ज्या ऊस उत्पादक शेतक-यांना को ८६०३२ किंवा व्ही.एस.आय.०८००५ या ऊस जातीची ऊस रोपापासून ऊस लागवड केलेली असेल व असा ऊस कारखान्याकडे गळीतास आल्यास त्यास रु.४,०००/-प्रती एकरी अनुदान देण्यात येईल.

५) **<u>रासायनिक खते</u>** :- आडसाली ऊस पिकास प्रती एकरी २ गोणी युरीया व २ गोणी इफको १०:२६:२६ अथवा तत्सम खते तसेच ठिबक सिंचनावरील विद्राव्य खते इफको १८:१८:१८ व १७:४४:०० (रु.३,०००/-रक्कमेपर्यत प्रती एकर) धोरणाप्रमाणे उपलब्धतेनुसार उधारीने पुरवठा करणेत येईल.

६) **<u>तणनाशके</u>** :- ऊस पिकातील तण नियंत्रणाकरीता कारखान्यामार्फत मेट्रीब्युझीन ७०%WP चा धोरणाप्रमाणे उधारीने पुरवठा करण्यात येईल.

७) **<u>दुय्यम अन्नद्रव्ये (गंधक)</u>** :- दुय्यम अन्नद्रव्ये म्हणुन गंधक (सल्फर) एकरी १० किलो या प्रमाणात उधारीने धोरणाप्रमाणे उपलब्धते नुसार पुरवठा करण्यात येईल.

८) **<u>सुक्ष्म अन्नद्रव्ये व वसंत उर्जा</u>** :- व्ही.एस.आय. निर्मित मल्टिमायक्रोन्युट्रीयन्ट या सुक्ष्म अन्नद्रव्याचा एकरी ५ लिटर (१ कॅन) व वसंत उर्जा एकरी १ लिटर मागणीप्रमाणे उधारीने उपलब्धतेनुसार पुरवठा करण्यात येईल.

९) **<u>द्रवरुप जिवाणू खते व किडनियंत्रके</u>** :- रासायनिक खताचा अतिवापर टाळणे करीता व ऊस पिकास नत्र स्फुरद,पालाश व इतर सुक्ष्मअन्नद्रव्य उपलब्ध होणेच्या दृष्टीने व्ही.एस.आय पुणे निर्मित द्रवरुप सॉईल हेल्थ, प्लॅन्ट हेल्थ, तसेच जैविक किड नियंत्रकांचा (बी.व्ही.एम) उधारीने पूरवठा करण्यात येईल.

कारखान्यामार्फत ऊस लागवडीकरीता वरीलप्रमाणे देण्यात येणा-या वस्तुरुप सहाय्य (बेणे,रासायनिक खते,तणनाशके,सुक्ष्मअन्नद्रव्ये, जिवाणु खते व किडनियंत्रके इ.) ची वसुली १२.५% व्याज दराने देय ऊस बिलातुन प्राधान्याने करणेत येईल. तथापि सदर ऊस काही अपरिहार्य कारणास्तव गळीतास न आल्यास त्यांना देय असलेले अथवा एकत्रित कुटुंबातील व्यक्तींचे देय पेमेंटमधुन सदरची रक्कम प्रचलित व्याजदराने वसुल करणेत येईल.त्याचप्रमाणे खालील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

**१.ऊस पिकाची नोंदणी ऊस लागवड झालेनंतर ३ दिवसांचे आत करणे बंधनकारक आहे.**

**२.कारखान्यामार्फत रासायनिक खते, इ.घेतेवेळी स्वत:चे आधारकार्ड दाखविणे बंधनकारक राहील.तसेच इतर व्यक्तीच्या नावावरील रासायनिक खते घेण्यासाठी संबंधित व्यक्तीचे संमतीपत्र देणे आवश्यक राहील.**

आडसाली ऊस लागवड योजनेच्या शर्ती व अटी ह्या प्राथमिक स्वरुपाच्या असुन त्यात बदल करण्याचा अधिकार मा.संचालक मंडळाने राखुन ठेवलेला आहे.सदर योजनेचा लाभ घेऊन ऊस लागवडी वाढविणेस कारखान्यास सहकार्य करावे.

आपला विश्वासु,
गि.ज.जगताप,
कार्यकारी संचालक

**"काळजी घ्या,सुरक्षित रहा"**